भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५६९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०८/२०१७

**१) डिझेलची चोरी. :—**

दिनांक १२/०८/२०१७ चे ०२.४५ वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे घरासमोर उभे असलेले ०३ ट्रॅक्टर पैकी २ ट्रॅक्टर १) ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ डी ८७९०, २) ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ३१६ मधुन प्रत्येकी अंदाजे ५—५ लिटर असा एकुन १० लिटर डिझेल कि. ६००/रु चा कॅन मध्ये भरून चोरी करून पळुन गेल्याने फिर्यादी विनुधर केशवराव शेंडे वय ४० वर्ष रा. साकोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे एक जखमी . :—**

दिनांक ११/०८/२०१७ चे ०६०० वा. दर. यातील फिर्यादी शरद शंकर तिजारे वय २० वर्ष रा. दवडीपार याचा भाऊ आकाश शंकर तिजारे वय १८ वर्ष हा रनिंग मारण्यास गेला व परत पायी—पायी आपले गावी दवडीपार येथे येत असतांनी मागेहुन भंडारा कडे जाणाऱ्या यातिल आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे भावास धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**३) एसटी चालकांच्या निष्काळजीपणामुळे सायकल चालकास धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १२/०८/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बस हयगयीने निष्काळजीपने चालवुन यातील सायकल हातात घेवुन जाणारा मृतक दिलीप तुळसीराम कासारे वय ५० वर्ष रा. वार्ड न. ०५ अडयाळ यास धडक मारून जखमी करून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी संजय तुळसीराम कासारे वय ४५ वर्ष रा. वार्ड न. ०५ अडयाळ यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३०४,(अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**४) भरधाव ट्रकच्या धडकेत मोटार सायकल स्वारच्या मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १२/०८/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील मृतक मंगलमुर्ती चंद्रभान बुराडे वय ३५ वर्ष रा. डोंबेविरली हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ सी ३९१६ स्प्लेन्डर प्लस ने भागडी कडुन परसोडी नाग चौकातुन डांबेविरली कडे जात असता, यातील अज्ञात आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक लाखांदुर कडुन पवनी कडे नेत असता, त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने निष्काळजीपने चालवुन मृतकचे मोटार सायकला धडक मारून मृतकाचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी विनोद चंद्रभान बुराडे वय ३८ वर्ष रा. डांबेविरली यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३०४,(अ)२७९, भादंवि. सहकलम १३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.निंबेकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

५) संगनमत करून शेतीत नांगरटी करण्यास अडथडा निर्माण करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने व कोर्टाच्या आदेशाचे उलंघन केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १२/०८/२०१७ चे १३.३० वा. दर. यातील फिर्यादी राजकुमार गुलाबजी लांबट वय ३६ वर्ष रा. नेहरूवार्ड मोहाडी हा आपले मालकीचे शेतातील नौकरासह ट्रॅक्टर घेवुन नांगरटी करण्यास गेला असता यातील आरोपीतांनी संगनमत करून ट्रॅक्टर समोर आडवे होवुन हातात कुऱ्हाड व कुदळ घेवुन नांगरटी करण्यास अडथळा करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने व कोर्टाने सदर शेती आरोपीतांना मनाई करण्याचे आदेशचे उलंघन केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्टसह दिलेल्या कागद पत्रावरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३४१,४४७ ,५०६ १८८ ,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.गिऱ्हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

६) दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १२/०८/२०१७ चे १९.१५ ते १९.४५ वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ इ ७१६६ ही दारू पिवुन दारूचे नशेत बिना लायसन्स व इंशुरन्स विमा न उतरवीलेले, पिऊसी सर्टीफीकेट न काठलेले वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने त्याचे श्वासाचा नमुना ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता, अल्कोव्होलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो.शि. राठोड यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५,(१),१४६/१९६,१९५(७) सिएमव्हिआर/१७७, ३/१८८ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भुरले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

७) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक ११/०८/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील मृतक जोगेश्वर काशीराम भाजीपाले वय ४८ वर्ष, रा. परसोडी हा दिनांक ०२/०८/२०१७ ला विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचार कामी सामान्य रुग्णालय भंडारा येथे नेवुन वार्ड क्र. ९ मध्ये उपचार कामी भरती केले असता दिनांक ११/०८/२०१७ चे ०६.०० वा. मरण पावल्याने पोस्टे भंडारा मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे टपालव्दारे प्राप्त कागदपत्रावरुन सरतर्फे पोना. मडावी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

८) विष प्राशन केल्याने इसमाचा मृत्यु . :–

दिनांक १२/०८/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील मृतक नंदकिशोर सुधनाम बोपचे वय ५२ वर्ष, रा. सातलवाडा हा फिर्यादीचे वडील असुन दिनांक १२/०८/२०१७ ला १६.०० वा. दर. शेतातील धान पाहण्याकरीता फिर्यादी हा गेला असता त्याचे वडील मृतक हे शेताचे पारीवर लुस्त पडलेले दिसले त्याचे जवळ जावुन पाहीले असता तोंडातुन पांढरे फेस निघत असल्याचे दिसल्याने वडीलास फिर्यादीने औषधोपचारा करीता ऑटोने उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे आणले असता तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केले व मृतकने संशयीत विष प्राशन केल्याने डॉ. मेमो व फिर्यादी जितेन्द्र किशोर बोपचे वय २२ वर्ष, रा. सातलवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

९) विदयुत करंट लागुन युवकाचा मृत्यु . :–

दिनांक ११/०८/२०१७ चे १५.०० वा. दर. यातील मृतक सत्यवान प्रितीलाल तुरकर वय २७ वर्ष, रा. उसरला हा दिनांक ११/०८/२०१७ चे १५.०० वा. पुर्वी शेतामध्ये पाणी वागवित असता ईलेक्ट्रीक शॉक लागल्याने त्याला त्याच अवस्थेत सु. बो दवाखाना तुमसर येथे नेले असता वैदयकीय अधिकारी यांनी मृत घोषीत केल्याने पो. स्टे. तुमसर मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे जा. क्र. ३८४२/१७ अन्वयेचे प्राप्त कागदपत्रावरुन सरतर्फे फिर्यादी पोहवा. येळमाचे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परतेकी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

१०) अवैध दारु / जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक १२/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे कारधा, वरठी, साकोली, अडयाळ व साकोली येथे दारू / जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हा. भ. दारू किंमती २२००/–रु. तसेच जुगारातुन किमती ४९०/रु असा एकुण कि. २,६९०/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १२/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२३११५१८२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.